2 3 NOV 2025
सकाळ

# परीक्षेत 'डमी' बसविणाऱ्या कॉलेजवर कारवाई करा

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २२ : परीक्षेत डमी विद्यार्थ्याला बसविण्याचा प्रकार आसुर्ले-पोर्ले परिसरातील एका कॉलेजमध्ये घडला आहे. त्याबाबत विद्यार्थी आणि कॉलेज प्रशासनावर फौजदारी कारवाई करण्याची मागणी युवासेनेने (ठाकरे गट) केली आहे. त्याबाबतचे निवेदन या संघटनेने शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू, प्रभारी प्र-कुलगुरू आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकांना दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, या कॉलेजमध्ये परीक्षेला डमी विद्यार्थी बसविण्याचे अनेक प्रकार होतात. याबाबत यापूर्वीदेखील परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकांना माहिती देऊन त्या कॉलेजमधील परीक्षा केंद्र रद्द करण्याची मागणी केली होती. आता पुन्हा एकदा परीक्षेला डमी विद्यार्थी बसविण्याचा प्रकार घडला आहे. त्याबाबत युवासेनेने नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात तक्रार केली. मात्र, त्यावरदेखील अद्याप विद्यापीठाने कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणाची चौकशी करून विद्यापीठाने त्यातील दोषींवर त्वरित फौजदारी कारवाई करावी.

यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख मंजित माने, शहरप्रमुख सुमित मेळवंकी, शहर समन्वयक प्रथमेश देशिंग उपस्थित होते. दरम्यान, या प्रकरणाबाबत चौकशी समिती नेमण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून सुरू असल्याचे परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

2 3 NOV 2025

सकाळ

## आंतरविभागीय पुरुष बास्केटबॉल स्पर्धा



कोल्हापूर : आंतरविभागीय पुरुषांच्या बास्केटबॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव विश्वनाथ मगदूम.

# न्यू कॉलेज, नाईट कॉलेज संघांचा अंतिम फेरीत प्रवेश

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे आयोजित आंतरविभागीय पुरुषांच्या बास्केटबॉल स्पर्धेत न्यू कॉलेज व नाईट कॉलेजने अंतिम फेरीत आज प्रवेश केला. कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव विश्वनाथ मगदूम यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले. शहाजी लॉ कॉलेजच्या मैदानावर स्पर्धा होत असून, बारा संघ पात्र ठरले आहेत.

उपांत्य फेरीतील सामन्यात न्यू कॉलेजने मिरज महाविद्यालयाचा ५३ विरुद्ध २७ गोलफरकाने पराभव केला. दुसऱ्या सामन्यात नाईट कॉलेजने विजयसिंह यादव महाविद्यालयावर ६७ विरुद्ध ५६ गोलफरकाने मात केली. स्पर्धेतून नांदेड येथे होणाऱ्या क्रीडा महोत्सव व पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता शिवाजी विद्यापीठाचा संघ निवडला जाणार आहे. यावेळी प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी, प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील, डॉ. नंदकुमार पाटील, डॉ. आकाश बनसोडे, डॉ. समीर पवार, डॉ. एस. जे. फराकटे, डॉ. संजय पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

2 3 NOV 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आंतरविभागीय बास्केटबॉल स्पर्धा उत्साहात

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभागातर्फे शहाजी लॉ कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय बास्केटबॉल पुरुष स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील एकूण बारा संघ पात्र ठरले होते.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कौन्सिल ऑफ एज्युकेशन सचिव माननीय विश्वनाथ मगदूम उपस्थित होते. यावेळी अधिष्ठाता आणि डीआरके कॉलेज ऑफ



कॉमर्सच्या प्राचार्या डॉ. वर्षा मैदर्गी, शहाजी लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील, बास्केटबॉल पुरुष निवड समितीचे चेअरमन डॉ. नंदकुमार पाटील, सदस्य डॉ. आकाश बनसोडे, डॉ. समीर पवार, स्पर्धा निरीक्षक डॉ. सुरेश फराकटे, डॉ. संजय पाटील आदी उपस्थित होते.

स्पर्धेमधून पुढील महिन्यात नांदेड येथे होणाऱ्या क्रीडा महोत्सव आणि पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ निवडला जाणार आहे. प्रा. किरण पाटील, प्रा. सुचय खोपडे, केदार सुतार, अमित दलाल, सुनील देसाई, आमिर मुल्ला, सूरज वाघेला, अजित तिवडे यांनी संयोजन केले.

सामन्यांमधून न्यू कॉलेज कोल्हापूर, नाईट कॉलेज कोल्हापूर, मिरज महाविद्यालय मिरज आणि विजयसिंह यादव महाविद्यालय पेठवडगाव या संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला.

2 3 NOV 2025

लोकमत

# न्यू, नाईट कॉलेज उपांत्य फेरीत

## आंतरविभागीय बास्केटबॉल पुरुष स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभागामार्फत शहाजी लॉ कॉलेज येथे आयोजित आंतरविभागीय बास्केटबॉल पुरुष स्पर्धेत कोल्हापुरातील न्यू कॉलेज, नाईट कॉलेज , मिरज महाविद्यालय आणि विजयसिंह यादव महाविद्यालय पेठवडगाव यांनी उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला आहे. या स्पर्धेमध्ये विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील एकूण बारा संघ पात्र ठरले होते. स्पर्धेचे उद्‌घाटन कौन्सिल ऑफ एज्युकेशन सचिव विश्वनाथ मगदूम, प्राचार्या डॉ. वर्षा मैदर्गी ,शहाजी लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील, बास्केटबॉल निवड समितीचे चेअरमन डॉ. नंदकुमार पाटील, सदस्य डॉ. आकाश बनसोडे, डॉ. समीर पवार, स्पर्धा निरीक्षक डॉ, सुरेश फराकटे, डॉ. संजय पाटील यांच्या उपस्थितीत झाले. या स्पर्धेमधून पुढील महिन्यात नांदेड येथे होणाऱ्या क्रीडा महोत्सव आणि पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ निवडला जाणार आहे. प्रा. किरण पाटील, प्रा. सुचय खोपडे,श्री केदार सुतार, अमित दलाल, सुनील देसाई, आमिर मुल्ला, सूरज वाघेला, अजित तिवडे यांनी संयोजन केले.

2 3 NOV 2025

पुण्यनगरी

# एका दिवसात पदवीधरांना गुणपत्रिका प्रत देण्याचे आश्वासन

**कोल्हापूर :** पदवीधरांच्या मागणीनुसार एकाच दिवसात गुणपत्रिकेची प्रत देण्याचे आश्वासन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव विलास शिंदे यांनी पदवीधर मित्रचे अध्यक्ष माणिक पाटील-चुयेकर यांच्या नेतृत्वाखालील याबाबत भेटलेल्या शिष्टमंडळास नुकतेच दिले.

सध्या विधान परिषदेच्या पुणे मतदार ंघात पुढील वर्षी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होणाऱ्या निवडणुकीची मतदार नोंदणी प्रशासकीय पातळीवर सुरू आहे. ही मतदार नोंदणी करताना अर्जासोबत गुणपत्रिका अथवा प्रमाणपत्राची प्रत जोडणे अनिवार्य आहे; परंतु पुणे पदवीधर मतदारसंघात येणाऱ्या कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर या जिल्ह्यांतील अनेक ज्येष्ठ तसेच वयोवृद्ध पदवीधरांकडे गुणपत्रिका अथवा पदवी प्रमाणपत्रे उपलब्ध नाहीत. विद्यापीठाकडून गुणपत्रिकेची प्रत तत्काळ मिळाल्यास त्यांचा पदवीधर मतदार नोंदणीचा तसेच या निवडणुकीतील मतदानाचा मार्ग सुकर होणार आहे.

2 3 NOV 2025

पुण्यनगरी

# In Short

# करड्याळ येथे उद्यापासून 'देवचंद'चे श्रमसंस्कार शिबिर

**करड्याळ :** देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर ता. कागलच्या वतीने करड्याळ, ता. कागल येथे दि. २४ ते ३० नोव्हेंबरअखेर राष्ट्रीय सेवा योजनेनुसार श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन केले आहे. सप्ताहात श्रमदानासह रोज तज्ज्ञांच्या व्याख्याने होणार आहेत. याशिवाय संमोहनातून एकाग्रतेकडे, संरक्षण दलातील करिअरच्या संधी, नेत्रतपासणी शिबिर, हळदी-कुंकू, होम मिनिस्टरमध्ये जागर स्त्रीशक्तीचा अशा उपक्रमांची रेलचेल असणार आहे. शिबिरार्थी स्वयंसेवकांच्या वतीने २९ रोजी सायंकाळी ७ सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. याचे उद्घाटन जनता शिक्षण मंडळ, अर्जुननगरचे अध्यक्ष आशीषभाई शाह यांच्या हस्ते होणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून कागल पं. स. गटशिक्षणाधिकारी सारिका कासोटे, प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे, उपप्राचार्या एस. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. डॉ. ए. एस. डोनर आहेत. करड्याळच्या सरपंच प्रियांका पाटील, उपसरपंच शीतल ठक, ग्रामविस्तार अधिकारी विजय गावडे, शालेय कमिटी अध्यक्ष विजयकुमार बिरंजे, वि.मं.चे मुख्याध्यापक एल. डी. पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

2 3 NOV 2025

लोकमत

# ज्येष्ठ संशोधक देवधर यांचे मंगळवारी व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी व स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. २५) दुपारी २ वाजता 'मिट द सायंटिस्ट' उपक्रमांतर्गत भारत सरकारच्या पुणे येथील संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) ज्येष्ठ संशोधक तथा निवृत्त समूह संचालक काशीनाथ देवधर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

'ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारत' या विषयावर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हे व्याख्यान होणार आहे.